Impact Factor – 6.625 E-ISSN – 2348-7143

SHIVAJI COLLEGE HINGOLI


INTERNATIONAL RESEARCH FELLOWS ASSOCIATION'S

# RESEARCH JOURNEY

International E-Research Journal

PEER REFREED & INDEXED JOURNAL
February 2021
Special Issue 260 (B)

**Multidisciplinary Issue**



**Chief Editor -**
Dr. Dhanraj T. Dhangar,
**Assist. Prof. (Marathi)**
**MGV's Arts & Commerce College,**
**Yeola, Dist - Nashik [M.S.] INDIA**

**Executive Editors :**
Dr. Tejesh Beldar, **Nashikroad (English)**
Dr. Gajanan Wankhede, **Kinwat (Hindi)**
Mrs. Bharati Sonawane, **Bhusawal (Marathi)**
Dr. Rajay Pawar, **Goa (Konkani)**

RESEARCH JOURNEY

**This Journal is indexed in :**
- **Scientific Journal Impact Factor (SJIF)**
- **Cosmos Impact Factor (CIF)**
- **Global Impact Factor (GIF)**
- **International Impact Factor Services (IIFS)**

Assistant Professor
Shivaji College, Hingoli.
Tq.& Dist.Hingoli.(MS)

For Details Visit To : www.researchjourney.net

SWATIDHAN PUBLICATIONS

Impact Factor – 6.625 E-ISSN – 2348-7143

INTERNATIONAL RESEARCH FELLOWS ASSOCIATION'S

# RESEARCH JOURNEY

International E-Research Journal

PEER REFREED & INDEXED JOURNAL

February 2021

Special Issue 260 (B)

SHIVAJI COLLEGE HINGOLI

**Chief Editor -**
Dr. Dhanraj T. Dhangar,
Assist. Prof. (Marathi)
MGV's Arts & Commerce College,
Yeola, Dist – Nashik [M.S.] INDIA

**Executive Editors :**
Dr. Tejesh Beldar, Nashikroad (English)
Dr. Gajanan Wankhede, Kinwat (Hindi)
Mrs. Bharati Sonawane, Bhusawal (Marathi)
Dr. Rajay Pawar, Goa (Konkani)

*Our Editors have reviewed papers with experts' committee, and they have checked the papers on their level best to stop furtive literature. Except it, the respective authors of the papers are responsible for originality of the papers and intensive thoughts in the papers. Nobody can republish these papers without pre-permission of the publisher.*

*- Chief & Executive Editor*

SWATIDHAN INTERNATIONAL PUBLICATIONS

For Details Visit To : www.researchjourney.net

*Cover Photo (Source) : Internet – NASA's Perseverance Rover successfully touched down on Mars on Thursday, 18th February 2021.

© All rights reserved with the authors & publisher Price : Rs. 1000/-



T.C.

227

Assistant Professor
Shivaji College,Hingoli.
Tq.& Dist.Hingoli.(MS.)

'RESEARCH JOURNEY' *International E- Research Journal*
Impact Factor - (SJIF) - 6.625 (2019),
Special Issue -260 (B) - Multidisciplinary Issue
**Peer Reviewed Journal**

E-ISSN : 2348-7143
February 2021

SHIVAJI COLLEGE • HINGOLI •


| | | | |
|---|---|---|---|
| २८ | इ.स.१८५७ च्या उठावात खानदेशचा सहभाग | **प्रा.जगन्नाथ गोपाळ** | १५[illegible] |
| २९ | म. गांधीजींचा जळगाव जिल्ह्यातील जनतेवरील प्रभाव (सन १९२० ते १९४७) | **डॉ. बाळकृष्ण पाटील** | १[illegible] |
| ३० | आदिवासी विद्यार्थ्यांना गणितविषयाच्या अध्ययनात साहित्य हाताळताना येणाऱ्या अडचणी शोधून केलेल्या उपाययोजनांचा संपादणुकीवर होणाऱ्या परीणामांचा अभ्यास | **प्रा. सौ. व्ही. व्ही. बाविस्कर** | १६७ |
| ३१ | नागपूर जिल्ह्यातील मराठी दैनिकांच्या ग्रामीण वार्ताहरांची शैक्षणिक स्थिती | **गणेश खवसे** | १७२ |
| ३२ | पश्चिम महाराष्ट्रातील प्राथमिक कृषी पत संस्थांच्या पुनर्प्राप्तीची कामगिरी एक : चिकित्सक अभ्यास | **पी. ए. दीक्षित, प्रा. डॉ. ए. आर. मुंगी, प्रा. डॉ. ए. वाय. दीक्षित** | १७५ |
| ३३ | ग्रंथालयात माहितीचे व्यवस्थापन | **डॉ. प्रशांत पगाडे** | १८६ |
| ३४ | ग्रंथालय सुरक्षा : काल, आज आणि उद्या | **प्रा. तुळजाराम खैरे** | १९० |
| ३५ | प्राथमिक शाळांमधील दुर्गम भागातील मातांच्या सामाजिक, आर्थिक- स्थितीचा विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक विकासाशी असलेल्या संबंधाचा अभ्यास | **डॉ. श्रीमती व्ही.व्ही. बाविस्कर** | १९४ |
| ३६ | कन्नड सक्ती व महाराष्ट्र एकीकरण समितीचे कार्य | **डॉ. एस. एन. कांबळे** | २०० |
| ३७ | भंडारा जिल्ह्यातील तांदूळ पिकाच्या उत्पादकतेचे (कृषी कार्यक्षमतेचे) भौगोलिक अध्ययन | **प्रा. हरिचंद्र कैताडे, डॉ. मेघा सावरकर** | २०३ |
| ३८ | कोविड-१९ चा भारतीय शेतीवरील परिणाम | **डॉ. विजय शिंदे** | २१० |
| ३९ | कोविड-१९ मुळे भारतातील आर्थिक सामाजिक व राजकीय कारणांचा गरीब कुटुंबातील खेळाडूंच्या आरोग्यावर आणि खेळावर झालेला परिणाम एक अभ्यास | **डॉ. गुणाजी नलगे** | २१५ |
| ४० | मराठी दैनिकांच्या ग्रामीण वार्ताहरांची आर्थिक, सामाजिक स्थिती (नागपूर जिल्हा) | **गणेश खवसे** | २१९ |


*Our Editors have reviewed papers with experts' committee, and they have checked the papers on their level best to stop furtive literature. Except it, the respective authors of the papers are responsible for originality of the papers and intensive thoughts in the papers. Nobody can republish these papers without pre-permission of the publisher.*

*- Chief & Executive Editor*

Assistant Professor
Shivaji College,Hingoli
Tq.& Dist.Hingoli.(MS.)



228

'RESEARCH JOURNEY' *International E- Research Journal*
Impact Factor - (SJIF) - 6.625 (2019),
Special Issue -260 (B) - Multidisciplinary Issue
Peer Reviewed Journal

E-ISSN :
2348-7143
February 2021

# कोविड–१९ मुळे भारतातील आर्थिक, सामाजिक व राजकीय कारणांचा गरीब कुटूंबातील खेळाडूंच्या आरोग्यावर आणि खेळावर झालेला परिणाम–एक अभ्यास

SHIVAJI COLLEGE • HINGOLI •

प्रा. डॉ. गुणाजी पांडुरंग नलगे
संचालक, शारीरिक शिक्षण आणि क्रीडा विभाग
शिवाजी महाविद्यालय, हिंगोली
मो. ९४२००३८००८ /७०२०२७७७३५
Gmail – nalgegp21@gmail.com

**Abstract**

*कोरोना हा आजार २०१९–२० या वर्षात सुरु झाला. कोविड–१९ या नावाने पुर्ण जगात प्रसिध्द झाला. या महामारीने पुर्ण जगातील व्यवसाय, कारखाने, मजुरी बंद झाली. याचा परिणाम गरीब कुटूंबावर, गरीब कुटुंबातील खेळाडूंच्या आरोग्यावर, खेळावर झाला. जिवन जगण्यासाठी प्रत्येकाला पैसा लागतो. या महामारीमुळे उद्योग, व्यवसाय, कारखाने बंद झाले. जे मजुर आहेत, अस्थायी आहेत त्यांना कामावरुन कमी केले. त्यामुळे घर कसे चालवायचे, परीवारातील लोकांना खर्च कसा करायचा, मुलांचे शिक्षण कसे करावे, असे अनेक प्रश्न निर्माण झाले. गरीब कुटूंबातील खेळाडूला काम करुन प्रशिक्षण घ्यावे लागते. काम करुन खेळावे लागते. काम धंदेच बंद झाले. त्यामुळे अनेक कुटुंबाचे स्थलांतर झाले. जगण्यासाठी वनवन फिरावे लागले. अनेक मैलाचे प्रवास करुन आपल्या मुळ गावी, खेड्याकडे यावे लागले. जगण्याचाच प्रश्न निर्माण झाला. तर खेळ खेळावा कसा, त्यासाठी लागणारे साहित्य, सुविधा, कशा मिळवायच्या, वेळ कसा द्यावा. याचा प्रश्न यक्ष म्हणून समोर उभा राहिला. जगण्यासाठी प्रयत्न करीत असतांना स्थलांतरामुळे समाजातील, गावाकडील लोक स्विकारायला तयार नाहीत. कारण ही महामारीच भयानक रुप धारण करुन आलेली आहे. दीन दलितांचे, गरीबांचे, श्रमीकांचे या महामारीने जिवन उध्वस्त झाले. जगावे तर पैसा नाही, गावाकडे यावे तर कोणी जवळ घ्यायला तयार नाही. या परिस्थित राजकीय परिस्थितीत, कायदे कारणीभुत आहेत. संचारबंदी, लॉकडाऊन, झोनबंदी यामुळे खेळाडूंना सराव करण्यास बाहेर फीरने बंद झाले. मैदानावर सराव बंद झाला. अतीशय मेहनत करुन यशापर्यंत पोहोचण्याच्या उंबरठ्यावर असतांना महामारीने घाला घातला. सर्व मेहनतीवर पाणी फेरले. कित्येक खेळाडू वयोमर्यादेच्या सीमेवर होते. त्यांना या स्पर्धेबाहेर जावे लागते की काय अशी चिंता लागली. सराव खंडीत झाला. पुर्ण जिम, मैदाने, कोचिंग सेंटर बंद झाले. अनेक खेळाडू आपले उदरनिर्वाह चालविण्यासाठी उद्योग करत होते, व्यवसाय करत होते. उदा. जिम चालविणे, ट्रेनिंग सेंटर चालविणे, लहान, मोठे व्यवसाय चालविणे हे कोविड–१९ मुळे बंद झाले. त्यामुळे पुर्ण कुटुंबावर उपासमारीची वेळ आली. अनेक कुटुंब उध्वस्त झाले. यामुळे खेळाडूंच्या आरोग्यावर परिणाम झाला. त्यांचा परिणाम खेळाडूंच्या प्रदर्शनावर झाला. अनेक खेळाडूंचे आयुष्य उध्वस्त झाले.*

**संज्ञा**– कोविड–१९, गरीब, मजुर, खेळाडू, स्पर्धा.

## प्रस्तावना

भारत हा विशाल लोकसंख्येचा देश आहे. जगात दुसऱ्या लोकसंख्या असल्यामुळे पुर्ण परिस्थितीत देताची वस्तुसाठी इतर देशांवर अवलंबुन रहावे लागते. आर्थिक परिस्थिती मध्यमच. त्यामुळे दरडोई कर्जाचा बोजा वाढतच चाललेला. शेतीप्रधान देश त्यामुळे जास्तीत जास्त लोक शेती व्यवसायाशी निगडित. कृषी मालावर आधारीत उद्योग आहेत. देशावर एखादे नैसर्गिक अथवा मानवी संकट आले की त्याचा फटका कृषी व कृषी उद्योगावर बसतो. ८०% समाज शेतीवर आधारीत असल्यामुळे त्यावर आधारीत गरीब व श्रमीक यांचे जिवनमान फार विस्कळीत होते. त्यांच्या यातना, कष्ट, जगण्यासाठीची धडपड बघेनाशी होते. मानवाच्या



Assistant Professor
Shivaji College,Hingoli.

SHIVAJI COLLEGE HINGOLI

अतिहव्यासापोटी, वर्चस्ववादापोटी, साम्राज्यवादासाठी, जगातील मानवावर वर्चस्व निर्माण करण्यासाठी अनेक देशात चढाओढ लागलेली दिसते. अशाच वर्चस्वाच्या हव्यासापोटी चीन देशाने कोविड–१९ हा विषाणू जगात पसरविल्याचे काम केले. यात पुर्ण जग होरपळले जात आहे. देशावर कोणतेही संकट आले की, सरळ परिणाम हा कामकरी, कष्टकरी, नोकरदार यावर होतो. असेच झाले कोरोनामुळे कारखाने बंद पडले, उद्योग व्यवसाय बंद झाले. शेती व्यवसायाशी निगडित कामे बंद झाली. रोजगारांना रोजगार मिळणे बंद झाले. शेतीचे उत्पादन थांबले. कारखान्यातील उत्पादन थांबले. याचा सरळ परिणाम गरीब, श्रमीक, रोजदार, छोटे, व्यासायिक, गरीब खेळाडू यांच्या आरोग्यावर, जगण्यावर झाला. हाताला काम नाही त्यामुळे आर्थिक अडचणी निर्माण झाल्या. आर्थिक अडचणीमुळे खायचे काय हा प्रश्न निर्माण झाला. जगण्यासाठी पैसा तर लागतो. मग तो मिळवायचा कसा कारण पुर्ण उद्योग बंद झाले. त्यामुळे कामगार, मजुरदार यांना कामावरुन कमी केले. जगात हाहाकार माजला, गरीब लोक सैरवैर झाले. अन्नाच्या शोधात भटकंती सुरु झाली. कित्येक मैल अन्नाविना रस्ता पार करावा लागत होता. पोटात अन्नाचा कण नाही अन्नाच्या शोधात, कामासाठी, चालनेतर अपरिहार्य होते. अशाच परिस्थितीत चालताना ना आरोग्याची काळजी ना जिवाची पर्वा. अनेकांना आपल्या मुलाबाळांना गमवावे लागले. अनेक खेळाडूंना आपल्या खेळाला मुकावे लागले. स्वत:ही प्राण गमवावे लागले. अशीच एक घटना जालना जिल्ह्यात घडली. गरीब, मजुर काम नसल्यामुळे अन्नाच्या शोधात गावाकडे निघाले. पोटात अन्नाचा कण ही नाही. पण चालणे भाग होते. चालुन–चालुन थकल्यामुळे पुढे चालवेना म्हणून ज्या रस्त्याने जात होते त्या रस्त्यावरच म्हणजे रेल्वे पटरीवर झोपले. त्यांना काय माहित की, झोपलो तर कायमचे झोपावे लागेल. काळाने घाला घातला आणि रेल्वेने रुळावर झोपलेल्या, पोटात अन्नाचा कण नसलेल्या मजबुर मजुरांना कायमचे चिरडुन टाकले. अनेकांचे आयुष्य उध्वस्त झाले. याचा परिणाम मजुरदाराच्या खेळाडू मुलाच्या खेळावर व आरोग्यावर झाला. असेच अनेक गरीब आरोग्याच्या समस्यांनी ग्रासले, शरीर शक्तीहीन झाले. आजार बळावले पैसा नसल्यामुळे दवाखान्यात जाता आले नाही. दवाखान्यात गेले तर दवाखाने बंद. कित्येक ठिकाणी पैसे नसल्यामुळे दवाखान्यात घेतले नाही. ही महामारीच अशी आली की यात सर्वात जास्त नुकसान, गरीबांचे गरीब खेळाडूचे झाले.

कोरोनामुळे लॉकडाऊन लागले. त्यामुळे शासनाने बाहेर फिरण्यास, खेळण्यास मनाई केली. मैदाने बंद झाली. जे खेळाडू अतीशय मेहनत करुन यशा पर्यंत पोहोचले, यश अगदीजवळ आले पण कोरोनामुळे पुर्ण स्पर्धा रद्द झाल्या. मैदाने, जीम बंद झाल्या यामुळे खेळाडूंचे सराव करणे बंद झाले. त्याचा परिणाम त्यांच्या आरोग्यावर झाला. लॉकडाऊनमुळे कामे बंद झाली, नोकऱ्या गेल्या त्यामुळे आर्थिक परिस्थिती खालावली. स्थलांतरामुळे समाजातील इतर लोक आश्रय द्यायला, तयार नव्हती. काम नाही म्हणुन पैसा नाही, पैसा नाही म्हणुन खायला नाही. आणि खायला नसल्यामुळे त्याचा परिणाम आरोग्यावर आणि आपली कुटूंबे गमावण्यावर झाला. यात गरीब कुटूंबातील खेळाडूंचे आतापर्यंत केलेल्या मेहनतीवर पाणी फेरावे लागले. याला कारणीभुत राजकारण, अर्थकारण आणि समाजकारण आहे.

**उद्दिष्टे**

१) कोरोना महामारीमुळे कोणत्याही कारणाने कुटूंबाच्या झालेल्या नुकसानाचा आढावा घेणे.

२) कोविड–१९ मुळे गरीब कुटूंबातील खेळाडूंचे आरोग्य आणि खेळावर झालेल्या परिणामांचा वेध घेणे.

**गृहितके**

१) कोवीड–१९ मुळे आर्थिक कारणांचा खेळाडूंच्या आरोग्यावर झालेला परिणाम.



230

T.C.
Assistant Professor
Shivaji College,Hingoli.
Tq.& Dist.Hingoli (M.S.)

२) कोवीड–१९ मुळे सामाजिक कारणांचा खेळाडूंच्या आरोग्यावर झालेला परिणाम.

३) कोवीड–१९ मुळे राजकीय आदेशांचा गरीब कुटुंबातील खेळाडूंच्या आरोग्यावर झालेला परिणाम.

SHIVAJI COLLEGE HINGOLI

**संशोधन पध्दती**

अभ्यास माहितीच्या दुय्यम स्त्रोतावर आधारित आहे. माहिती–वर्तमानपत्रे, लेख आणि वेब सारख्या विश्वसनिय स्त्रोताकडून गोळा केली गेली आहे.

विषयाचे महत्व

पंचवीस, तीस वर्षापुर्वी खेड्यातुन गरीब शेतकऱ्यांचा शिकलेला मुलगा नोकरीसाठी, पोटाची खळगी भरण्यासाठी, खेळाची आवड म्हणून शहराकडे गेला होता. तेथे त्याने अनेक स्पर्धांना टक्कर देत, वेळ प्रसंगी अर्ध पोटी राहून आपल्या स्वप्नांना साकार करण्यासाठी जिवाचे रान करुन सराव करत राहिला. काही जन तर प्राथमिक स्तरावर आणि काही उच्च स्तरावर आपले नशिब, आजमावत होते. काही त्यात यशस्वी होवुन अगदी आनंदाने जगत आहेत. त्यांचाच आदर्श डोळ्यांसमोर ठेवुन आपणही आपले प्राण पणाला लावुन लढायचे, तर काही जण राष्ट्रीय, आंतरराष्ट्रीय स्तरावरच्या पदकापर्यंत पोहोचण्यासाठी फक्त एक पाऊल दुर. पण या कोरोना महामारीमुळे जगणेही गरीबाला मुश्कील झाले. हाताला काम नाही. कुटुंबाची जबाबदारी पडलेली. शेती नाही आणि थोडी असली तरी ८ ते १० जनांचे पोट कसे भरणार. खेळून यश प्राप्त करुन कुठे पोलीसात, मिलीट्रीत, कंपनीत नोकरी करता येईल यासाठी जिवाचे रान. पण त्यातच कोरोना महामारीने जगाला वेढले. पुर्ण दळणवळण व्यवस्था बंद, व्यापार, उद्योग, कारखाने, छोटे, मोठे व्यवसाय पुर्ण पणे बंद झाले. यामुळे श्रीमंत, उद्योजक, व्यापारी, नोकरदार यांच्यावर परिणाम झाला. यांचे नुकसान ही झाले आणि होत आहे. पण या कोरोनाने खरा कोणी होरपळला, अतोनात नुकसान झाले, न भरुन निघनारी झीज झाली असेल तर ती शेतकरी, ज्यांचे हातावर पोट आहे. करो या मरो अशी परिस्थिती असणारे गरीब कुटुंबातील कामगार, त्यांचे कुटुंब यांचे बेहाल झाले. घरेच्या घरे उध्वस्त झाले. हाताला काम नाही म्हणुन बेकारी वाढली. त्यामुळे कुटुंबाची उपासमार सुरु झाली. सरकार रशन देत होते. पण रशन घ्यायला काई नाही. कारण कामगार बाहेरुन आलेला आहे. त्यामुळे कुटुंबाची तरुणांचे, खेळाडूंचे सर्वात जास्त नुकसान झाले. त्यांच्यावर उपासमारीची वेळ आली. उपाशी पोटीने तत्वज्ञान काही कामाचे नसते. स्पर्धाचे सराव बंद झाले. मैदानावर प्रवेश बंद झाले. बेरोजगारी वाढली मे महिन्यातील तामिळनाडूतील बेरोजगारी प्रमाण ४९.८०: आहे. बिहार ४६.६० टक्के, झारखंड ४७.१० टक्के असे प्रमाण वाढत चालले आहे. या महामारीने कीती विदारक चित्र निर्माण केले. हाताला काम नाही म्हणून जवळ पैसे नाही आणि पैसे नाही म्हणून खायला भेटत नाही. अशाच परिस्थितीत काही मजबुर मजुर काम बंद झाले म्हणुन जालन्यावरुन गावाकडे जातांना औरंगाबाद जवळ पटरीने चालत होते. चालुन चालुन थकले. ८ मे २०१९ रोजी सकाळी ३ वाजता जवळ असलेली वाळून गेलेली भाकरी खाली. आणि रात्रभर चालुन थकवा आल्यामुळे बसल्या जागीच झोपा लागल्या. झोपले ते कायमचे झोपले कारण रेल्वे आली आणि त्यांना चिरडुन गेली. यात १६ मजुर जाग्यावर ठार झाले. असे विदारक दृश्य या कोरोनाने केले.

"बॅडमिंटन प्रशिक्षक संजन मिश्रा म्हणतात कोवीड–१९ मुळे खेळ ठप्प झाले. बॅडमिंटन खेळाडूत चिडचिड व निराशा निर्माण झाली. खेळाडूंना समजावतांना प्रशिक्षकापेक्षा काऊन्सिलर जास्त झाले असे म्हणतात."१

भारत सरकारला तरुणांना लष्करी सेवेकडे आकर्षित करण्यासाठी विस ऐवजी तीस वर्षाची लष्करी सेवेची संधी देणारा 'टूर ऑफ आर्मी' हा उपक्रम जाहीर करावा लागला. कोरोनामुळे भारतीय तरुणांची शारीरिक



231

Assistant Professor
Shivaji College, Hingoli

व मानसिक कमजोरी अधोरेखीत झाली आहे. अमेरिकेत एप्रिल–मे महिन्यात ३ कोटी ६० लाख नागरिकांनी बेरोजगार भत्ता मिळावा म्हणून नोंदणी केली. अशी अवस्था जर अमेरिकेची असेल तर भारतातील गरीबांचे काय हाल असतील याचा विचार करणेही अवघड आहे. यात महिला खेळाडूंचे तर अतीशय अवघड झाले. अनेक खेळाडू मुलींचे कोरोना काळात लग्न झाले. कारण नेमकेच यशाच्या जवळ अनेक मुली असताना कोवीड–१९ मुळे सराव बंद झाले. ट्रेनिंग कॅम्प, वस्तीगृहे, शाळा, कॉलेजेस बंद झाले. त्यामुळे घरी परत यावे लागले. वाढत्या वयामुळे पालकांची चिंता वाढली. कोरोना काळात पालकांनी कमी खर्चात लग्न होत असल्यामुळे गरीब कुटुंबातील मुलींचे लग्न लावुन दिले. यामुळे महिला खेळाडुंचे अतोनात नुकसान झाले.

या महामारीमुळे राज्य, राष्ट्रीय, आंतरराष्ट्रीय व ऑलम्पीक सारख्या स्पर्धा झाल्या नाहीत. या स्पर्धांतुन मिळणारे मानधन, बक्षिसे, या स्पर्धांवर आधारीत ट्रेनिंग कॅम्प, कोचिंग स्कुल, कोचिंग कॅम्प या स्पर्धांसाठी लागणारे साहित्य तयार करणारे खेळाडू मजुर यांचे इनकम बंद झाले. बेकार झाले. उपासमारीची वेळ आली. खेळ न झाल्यामुळे खेळाडूंचे नुकसान आणि यावर आधारीत उद्योगांचे, मजुरांचे नुकसान झाले.

निष्कर्ष

कोवीड–१९ मुळे जगातील प्रत्येकाचे काही नाहीतर काही नुकसान झालेच आहे. कोणाचे आर्थिक तर कोणाची सामाजिक तर कोणाचे औद्योगिक नुकसान झाले. पण गरीब ज्याचे खेळावरच आयुष्य अवलबुन आहे. त्यांचे मात्र अतोनात नुकसान झाले. पैसाही गेला, वेळही गेला, वयही गेल, यशही गेल, आणि यात काही जणाचे कुटुंब गेले. सहकारी गेले. असे प्रचंड आर्थिक, मानसिक, शारीरिक, सामाजिक न भरून निघणारे नुकसान झाले. काही नुकसान भरून काढता येते. पण काही भरून न काढता येणारे नुकसान वय, वेळ, संधी, सोबती, कुटुंब गेले. हे न भरणारे नुकसान या कोवीड–१९ मुळे झाले.

## संदर्भ

१. दैनिक लोकमत दि. १० मे २०१९
२. एप्रिल २०१९ ते ऑगस्ट २०१९ या काळातील दैनिक लोकमत वर्तमान पत्रातील लेख.

T.C.

Assistant Professor
Shivaji College,Hingoli.
Tq.& Dist.Hingoli.(MS.)



232